सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधी व न्याय विभाग

# सन १९४६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २०

# महाराष्ट्र वीज (विशेष अधिकार) अधिनियम

(५ जून २०१३ पर्यंत सुधारित)

# Bombay Act No. XX of 1946

# The Maharashtra Electricity (Special Powers) Act

*(As modified upto 5th June 2013)*

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित केले.

२०१३

[किंमत : रुपये १०.००]

(सन १९४६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २०)

# महाराष्ट्र वीज (विशेष अधिकार) अधिनियम

## अनुक्रमणिका


उद्देशिका.

कलमे.

१. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

२. व्याख्या.

३. पुरविण्यात आलेल्या विजेच्या खपावर निर्बंध.

४. विशिष्ट परिस्थितीत पुरवठा बंद करणे.

५. विजेच्या पुरवठ्यावर निर्बंध व विजेच्या पुरवठ्यासाठी पुन्हा संयोजन करण्यास मनाई.

६. जाहिरातीसाठी विजेचा वापर करण्यावर निर्बंध.

६अ. विजेच्या पुरवठ्याचे नियमन करण्याचा अधिकार व काम करण्याच्या वेळा.

६ब. कलम ६अ अन्वये दिलेल्या आदेशाचा भंग केल्याबद्दल लायसन रद्द करणे किंवा पुरवठा बंद करणे.

६क. विद्युत निरीक्षक किंवा त्याचे सहाय्यक यांच्या कामाबद्दल फी देण्यात कसूर केल्याबद्दल ग्राहकास वीज पुरवठा बंद करणे.

७. अस्तित्वात असलेले आदेश अंमलात असण्याचे चालू.

८. शास्ती.

८अ. प्रवेश, वगैरे करण्याचा अधिकार.

९. स्थानिक प्राधिकाऱ्यांनी व महामंडळांनी केलेले अपराध.

१०. अपराधांची दखल घेणे.

११. अधिनियमान्वये करण्यात आलेल्या कृत्यांबद्दल संरक्षण.

१२. आदेश किंवा निदेश यांची बजावणी.

१३. निरसने व व्यावृत्ती.

## सन १९४६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २०.[1]

### [2][महाराष्ट्र वीज (विशेष अधिकार) अधिनियम]*

(३० सप्टेंबर १९४६)

ह्या अधिनियमात पुढील अधिनियम व आदेश यांन्वये फेरबदल, अनुकूलन व सुधारणा करण्यात आल्या आहेत :—

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४१.

विधि अनुकूलन आदेश, १९५०.

मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६.

सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २.

महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०.

**[3][मुंबई राज्यात] विजेचा पुरवठा, खप, वाटप व वापर [4][यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी विशेष तरतूद करण्याबाबत] अधिनियम.**

**ज्याअर्थी,** [3][मुंबई राज्यात] विजेचा पुरवठा, खप, वाटप व वापर [4][यावर नियंत्रण ठेवण्यासाठी विशेष तरतूद करणे] इष्ट आहे ; **त्याअर्थी,** या अन्वये पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, व्याप्ती [10][व प्रारंभ].

**१.** (१) या अधिनियमास, [2][महाराष्ट्र वीज ([5][विशेष] अधिकार) अधिनियम] असे म्हणावे.

[6][(२) †हा संपूर्ण [7][महाराष्ट्र राज्यास] लागू आहे.]

१९५९ चा मुंबई २.

(३) तो [8][पुनर्रचनेपूर्वीच्या] [3][मुंबई राज्यात] १ ऑक्टोबर १९४६ रोजी अंमलात येईल [8][आणि मुंबई विद्युत (विशेष अधिकार) (व्याप्ती वाढवणे व सुधारणा) अधिनियम, १९५८ द्वारे तो मुंबई राज्याच्या ज्या भागास लागू करण्यात आला असेल त्या भागात, राज्य शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमून देईल अशा इतर तारखेस अंमलात येईल.]

[9] * * * * * *

---

[1] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी, पहा.—मुंबई शासन राजपत्र, १९४६, भाग पाच, इं. पृष्ठ १२२; विधानसभेमधील कामकाजासाठी, पहा.—मुंबई विधानसभेतील वादविवाद, १९४६, खंड नऊ आणि विधानपरिषदेमधील कामकाजासाठी, पहा.—मुंबई विधानपरिषदेतील वादविवाद, १९४६, खंड दहा.

[2] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४, अनुसूचीद्वारे अधिनियमाच्या नावात बदल करण्यात आला.

[3] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्र. २ याच्या कलम ३ द्वारे 'मुंबई प्रांत' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम २ द्वारे हा मजकूर "नियंत्रण ठेवण्याच्या शक्ती चालू ठेवण्याची तरतूद करण्यासाठी" या ऐवजी दाखल करण्यात आला.

[5] वरील अधिनियमाच्या कलम ३(१) द्वारे हा शब्द "आपाती" या शब्दाऐवजी दाखल करण्यात आला.

[6] सन १९५९ चा मुंबई २ च्या कलम ४(अ) अन्वये हे पोट-कलम मूळ पोट-कलमाऐवजी दाखल करण्यात आले.

[7] महाराष्ट्र विधी अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० द्वारे 'मुंबई राज्यास' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[8] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ४(ब) अन्वये 'तो' या शब्दानंतर व तसेच 'अंमलात येईल' या मजकुरानंतर हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[9] सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्र. ४१, कलम ३ (२) अन्वये पोट-कलम (४) वगळण्यात आले.

[10] वरील अधिनियमाच्या कलम ३(३) अन्वये हा मजकूर "सुरुवात व कालावधी" या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

* हा अधिनियम, सन १९५९ चा मुंबई २, याच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी मुंबई राज्याच्या ज्या भागाला लागू करण्यात आला नव्हता त्या भागाला लागू करण्यात आला. (१९५९ चा मुंबई २ चे कलम २ पहा)

† या मजकुरात फेरबदल करण्यात आलेला नाही [पहा महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०].

(शा.म.मु.) एच ४१०४–२ (६,०९७—७-१३)

व्याख्या. २. विषयात किंवा संदर्भात एतद्विरुद्ध काही नसल्यास, ह्या अधिनियमात,— १९१० चा ९.

(अ) " ग्राहक "[१] * * * व " कामे " या शब्दाचा अर्थ भारतीय वीज अधिनियम, १९१०, कलम २ यात जो दिलेला आहे तोच असेल,

[२][अअ] " लायसनधारक " या संज्ञेचा अर्थ, भारतीय वीज अधिनियम, १९१०, भाग २ अन्वये विजेचा पुरवठा करण्यासाठी ज्यास लायसन देण्यात आले आहे अशी कोणतीही व्यक्ती किंवा जिने वीज पुरविण्याचा धंदा करण्यासाठी उक्त अधिनियमाच्या कलम २८ अन्वये मंजुरी मिळविली आहे अशी कोणतीही व्यक्ती, असा होतो व तीत वाटप करणारा लायसनधारक आणि वीज (पुरवठा) अधिनियम, १९४८, कलम ५ अन्वये प्रस्थापित केलेले [३][राज्य] वीज मंडळ यांचा समावेश होतो ;] १९१० चा ९. १९४८ चा ५४.

(ब) " मागणी " या संज्ञेचा अर्थ, भारतीय वीज अधिनियम, १९१० अन्वये विजेच्या पुरवठ्यासाठी केलेली मागणी असा होतो. १९१० चा ९.

पुरविण्यात आलेल्या विजेच्या खपावर निर्बंध. ३. कोणत्याही संविदेत किंवा करारात काहीही असले तरी, [३][राज्य] शासनास लेखी आदेशाद्वारे कोणत्याही ग्राहकास, अशा आदेशात निर्दिष्ट करण्यात येईल अशा मर्यादेपर्यंत आणि अशा रीतीने व अशा साधनांचा अवलंब करून विजेचा आपला खप कमी करण्यास भाग पाडता येईल आणि त्यानंतर अशा ग्राहकाने विजेचा आपला खप त्याप्रमाणे कमी केला पाहिजे. [३][राज्य], शासनाने वीज पुरविणाऱ्या लायसनधारकास आदेशाची एक प्रत देऊन त्याच्यावर असा आदेश बजावला पाहिजे.

विशिष्ट परिस्थितीत पुरवठा बंद करणे. ४. (१) भारतीय वीज अधिनियम, १९१० किंवा तदन्वये दिलेले कोणतेही लायसन अगर, विजेचा पुरवठा करण्याबाबत केलेला कोणताही करार यात काहीही असले तरी, [३][राज्य] शासनास विजेचा पुरवठा चालू ठेवण्यासाठी किंवा तिचे योग्य वाटप साध्य करण्यासाठी तसे करणे त्याच्या मते आवश्यक किंवा इष्ट असेल तर, लेखी आदेशाद्वारे,— १९१० चा ९.

विजेचे वाटप करणाऱ्या लायसनधारकाव्यतिरिक्त, जो कोणताही ग्राहक—

(अ) [३][राज्य] शासनाच्या परवानगीवाचून कलम ३ अन्वये त्यास दिलेल्या कोणत्याही निदेशांचे उल्लंघन करतो, अथवा

(ब) [३][राज्य] शासनाच्या परवानगीवाचून,—

[४][**(एक)** (एक) [५][महाराष्ट्र राज्याच्या मुंबई प्रदेशाच्या क्षेत्राच्या] संबंधात, दिनांक ३१ जानेवारी १९४३ रोजी संपणाऱ्या बारा महिन्यांच्या मुदतीत त्या प्रदेशाच्या बाबतीत त्यांच्या संबंधात नोंदण्यात आलेल्या वीज शक्तीच्या किलोवॅट्सच्या कमाल मागणीपेक्षा कोणत्याही वेळी वीज शक्तीचा अधिक खप करतो, किंवा

[६][* * * * *]

---

[१] सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४१ च्या कलम ४(१) अन्वये " अनुज्ञप्तिधारक " हा शब्द वगळण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ४(२) अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[३] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये हा शब्द " प्रांतीय " या शब्दाऐवजी दाखल करण्यात आला.

[४] सन १९५९ चा मुंबई अधिनियम २ च्या कलम ५ अन्वये, खंड (ब) मध्ये " राज्य शासनाच्या परवानगीवाचून " या मजकुरानंतर उप खंड (एक), (दोन) व (तीन) हे मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आले.

[५] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० द्वारे " (दुसऱ्या राज्यात घातलेले प्रदेश वगळून) पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्याच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] वरील आदेशाद्वारे कलम ४ चा खंड (ब) एक यातील परिच्छेद (दोन) वगळण्यात आला.

(तीन) इतर कोणत्याही प्रदेशाच्या संबंधात, राज्य शासन विनिर्दिष्ट करील अशा तारखेस संपणाऱ्या बारा महिन्यांच्या मुदतीत त्यांच्या संबंधात नोंदण्यात आलेल्या वीज शक्तीच्या किलोवॅटस्च्या कमाल मागणीपेक्षा कोणत्याहीवेळी वीज शक्तीचा अधिक खप करतो; किंवा

**(दोन)** (एक) [१][महाराष्ट्र राज्याच्या मुंबई प्रदेशात] लायसनधारकास दिनांक ३१ जानेवारी १९४३ पर्यंत लेखी नोटीस देऊन कळविण्यात आलेल्या भारापेक्षा (लोड) अधिक भाराच्या वीज शक्तीचे संयोजन करतो किंवा त्याने केलेले आहे;

[२][* * * * *]

(तीन) इतरत्र राज्य शासन विनिर्दिष्ट करील अशा तारखेपर्यंत, लायसनधारकास लेखी नोटीस देऊन कळविण्यात आलेल्या भारापेक्षा (लोड) अधिक भाराच्या वीज शक्तीचे संयोजन करतो किंवा त्याने केलेले आहे; किंवा

**(तीन)** कलम ५, पोट-कलम (३) अन्वये राज्य शासनाने परवानगी दिलेला किंवा भारतीय वीज
१९१० अधिनियम, १९१० याच्या अनुसूचीच्या खंड ६ अन्वये केलेल्या मागणीस अनुसरून लायसनधारकाने
चा ९. मंजूर केलेला पुरवठा वाढवितो, किंवा;

[३][(क) लायसनधारकाने याबाबत त्याच्यावर लेखी नोटीस बजावल्यानंतर तीन महिन्यांच्या मुदतीत कोणतीही वीज वापरीत नाही.]

अशा कोणत्याही ग्राहकास करण्यात येत असलेला विजेचा पुरवठा बंद करण्याबाबत किंवा तो कमी करण्याबाबत लायसनधारकास,—

(एक) प्राधिकृत करता येईल, किंवा

(दोन) फर्माविता येईल

व अशा रीतीने फर्माविण्यात आल्यानंतर लायसनधारकाने त्याप्रमाणे अशा ग्राहकाचा विजेचा पुरवठा बंद केला पाहिजे किंवा तो कमी केला पाहिजे.

(२) लायसनधारकाने—

(एक) पोट-कलम (१) अन्वये विजेचा पुरवठा बंद करण्यापूर्वी किंवा कमी करण्यापूर्वी आपण तसे करणार आहोत याबद्दलच्या आपल्या उद्देशाची किमान ४८ तासांची लेखी नोटीस ग्राहकास दिली पाहिजे.

(दोन) पुरवठा बंद केल्यावर, तो बंद केल्याच्या तारखेपासून चोवीस तासांच्या आत तो ज्या परिस्थितीत त्याने बंद केला ती परिस्थिती [४][राज्य] शासनास कळविली पाहिजे.

(तीन) पुरवठा पुन्हा सुरू करण्याविषयी [४][राज्य] शासनाकडून निदेश देण्यात आला असता शक्य तितक्या त्वरेने पुन्हा पुरवठा सुरू केला पाहिजे.

(३) कलम ३ किंवा पोट-कलम (१), खंड (ब) अन्वये दिलेल्या कोणत्याही निदेशाचे उल्लंघन झाल्याचे लायसनधारकाच्या निदर्शनास येताच त्याने चोवीस तासांच्या आत त्याविषयी [४][राज्य] शासनास कळविले पाहिजे.

---

[१] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० द्वारे "(दुसऱ्या राज्यात घातलेले प्रदेश वगळून) पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्यात" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील आदेशाद्वारे कलम ४ चा खंड (ब) (दोन) यातील परिच्छेद (दोन) वगळण्यात आला.

[३] सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४१, कलम ५ या अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[४] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये हा शब्द "प्रांतीय" या शब्दाऐवजी बदली दाखल करण्यात आला.

विजेच्या पुरवठ्यावर निर्बंध व विजेच्या पुरवठ्यासाठी पुन्हा संयोजन करण्यास मनाई.

५. (१) भारतीय वीज अधिनियम, १९१० किंवा तदन्वये दिलेले कोणतेही लायसन किंवा विजेचा पुरवठा करण्यासाठी केलेली कोणतीही संविदा किंवा करार किंवा कोणतीही मागणी यात काहीही असले तरी [१][राज्य] शासनास, विजेचा पुरवठा चालू ठेवण्यासाठी किंवा तिचे योग्य वाटप साध्य करण्यासाठी तसे करणे त्याच्या मते आवश्यक किंवा इष्ट असेल तर लायसनधारकास आदेशाद्वारे— १९१० चा ९.

(अ) [१][राज्य] शासनाच्या परवानगीशिवाय,—

(एक) कोणत्याही व्यक्तीस (विजेचा पुरवठा पुन्हा चालू करण्याव्यतिरिक्त इतर बाबतीत) विजेचा पुरवठा करण्याबाबत किंवा अशा पुरवठ्यात वाढ करण्याबाबत केलेल्या कोणत्याही संविदेच्या, कराराच्या किंवा मागणीच्या तरतुदीचे लायसनधारकाने पालन करू नये (मग अशी संविदा, करार किंवा मागणी [२][कोणत्याही क्षेत्रात] ह्या अधिनियमाच्या प्रारंभापासून केलेली असो किंवा नंतर केलेली असो),

(दोन) विजेचा पुरवठा बंद केल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्यानंतर ग्राहकास विजेचा पुरवठा पुन्हा सुरू करू नये किंवा पुन्हा सुरू करण्याबाबत केलेली कोणतीही मागणी लायसन-धारकाने मान्य करू नये,

(तीन) विजेचा पुरवठा बंद केल्यापासून सहा महिन्यांच्या आत पुरवठा पुन्हा सुरू करण्याविषयी केलेली कोणतीही मागणी, जर अशी मागणी करणारा ग्राहक हा वीजपुरवठा बंद करण्याच्यावेळी स्वतः ती वीज वापरणारा ग्राहक नसेल तर, लायसनधारकाने मान्य करू नये,

असा निदेश देता येईल :

[३][परंतु [१][राज्य] शासनास, आदेशाद्वारे असा निदेश देता येईल की, आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा ग्राहकांस किंवा ग्राहकांच्या वर्गास व आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मर्यादेपर्यंत व अशा शर्तीस अधीन राहून जर लायसनधारकाने विजेचा पुरवठा केला तर अशी परवानगी मिळविण्याची आवश्यकता असणार नाही;]

(ब) नगरपालिकेसाठी (प्रतिस्थापनेव्यतिरिक्त इतर) कोणतीही नवीन कामे करणे किंवा पूर्वी केलेल्या कामात वाढ करणे किंवा त्यात फेरफार करणे यासंबंधी केलेली कोणतीही मागणी लायसनधारकाने मान्य करू नये.

असा निदेश देता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये आवश्यक असलेली कोणतीही परवानगी मिळविण्याकरिता लायसनधारकाने [१][राज्य] शासन, **शासकीय राजपत्रात** याबाबत अधिसूचित करील अशा नमुन्यात [१][राज्य] शासनाकडे अर्ज केला पाहिजे.

[४][भारतीय वीज अधिनियम, १९१० याच्या अनुसूचीतील खंड पाचच्या किंवा खंड सहाच्या उप-खंड (१) अन्वये लायसनधारकाकडे मागणी करण्यात आली असेल त्याबाबतीत अशा मागणीच्यासंबंधात लायसनधारकाने त्याच्याकडे मागणी आल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत किंवा [१][राज्य] शासन परवानगी देईल अशा त्याहून अधिक मुदतीच्या आत [१][राज्य] शासनाकडे अर्ज केला पाहिजे.] १९१० चा ९.

---

[१] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये हा शब्द "प्रांतीय" या शब्दाऐवजी दाखल करण्यात आला.

[२] सन १९५९ चा मुंबई २ च्या कलम ६ अन्वये कंसातील "करार किंवा मागणी" या मजकुरानंतर हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९४९ चा मुंबई अधिनियम ४१, कलम ६ (१) अन्वये या परंतुकाची भर घालण्यात आली.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ६ (२) अन्वये हा भाग समाविष्ट करण्यात आला.

(३) पोट-कलम (२) अन्वये अर्ज करण्यात आल्यावर, [१][राज्य] शासनाला एकतर मागितलेली परवानगी नाकारता येईल किंवा ती बिनशर्त किंवा त्यास ज्या शर्ती लादणे योग्य वाटेल अशा शर्तींच्या अधीन ठेवून देता येईल, तसेच त्यास अर्जासंबंधी जो आणखी तपशील आवश्यक असेल तोही मागविता येईल.

६. कोणत्याही संविदेत किंवा करारात काहीही असले तरी [१][राज्य] शासनाने याबाबत **शासकीय राजपत्रात** अधिसूचित केलेल्या लायसनधारकाकडून ज्या व्यक्तीला विजेचा पुरवठा मिळत असेल अशा कोणत्याही व्यक्तीने, अशा लायसनधारक विजेचा पुरवठा करीत असलेल्या क्षेत्रात कोणत्याही जागेच्या बाहेरील बाजूवर किंवा कोणत्याही भूमिखंडावर किंवा कोणत्याही रस्त्यावर किंवा खुल्या जागेत जाहिरात करण्याच्या उद्देशाने रोषणाई करण्यासाठी अशा विजेचा उपयोग करता कामा नये किंवा करण्याची व्यवस्था करता कामा नये. जाहिरातीसाठी विजेचा वापर करण्यावर निर्बंध.

[२][**६अ.** (१) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात किंवा कलम ५, पोट-कलम (३) अन्वये दिलेल्या कोणत्याही परवानगीत किंवा कायद्यापरत्वे अंमलात असलेल्या कोणत्याही लेखात काहीही असले तरी, [१][राज्य] शासनास, विजेचे वाटप, पुरवठा, खप किंवा वापर यावर नियंत्रण ठेवण्याच्या हेतूने पुढील गोष्टीबाबत आदेश देता येईल :— विजेच्या पुरवठ्याचे नियमन करण्याचा अधिकार व [५] * * * काम करण्याच्या वेळा.

(अ) अशा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कोणत्याही प्रयोजनासाठी लायसनधारकाने विजेचे वाटप किंवा पुरवठा करणे किंवा ग्राहकाने अशा विजेचा वापर करण्यास मनाई करणे किंवा अशा आदेशास [१][राज्य] शासन निर्दिष्ट करील अशा शर्तीस अधीन राहून याचे नियमन करणे [३][किंवा अशी वीज शक्ती किंवा तिचा कोणताही भाग कोणत्याही इतर व्यक्तीस किंवा उपक्रमास पुरवण्यास किंवा वापरू देण्यास ग्राहकास मनाई करणे.]

(ब) लायसनधारकाने ज्यास विजेचा पुरवठा केला असेल अशा उपक्रमाने [४][किंवा ग्राहकाने] अग्रतेच्या ज्या क्रमाने काम केले पाहिजे किंवा ज्या वेळेत किंवा वेळात काम केले पाहिजे तो अग्रतेचा क्रम किंवा ती वेळ किंवा त्या वेळा ठरविणे.

(२) [१][राज्य] शासनाच्या पोट-कलम (१) अन्वये केलेल्या कोणत्याही आदेशात, त्या, आदेशाच्या प्रयोजनाकरिता त्याला आवश्यक किंवा इष्ट वाटतील अशा कोणत्याही आनुषंगिक किंवा पूरक बाबींविषयी तरतुदी करता येतील.

**स्पष्टीकरण.**—या कलमात " उपक्रम " या संज्ञेचा अर्थ, कोणताही सार्वजनिक उपयुक्ततेचा उपक्रम किंवा कोणताही व्यापार किंवा धंदा चालविण्यासाठी सुरू केलेला उपक्रम असा समजावा व तीत कारखान्याचा समावेश होतो.]

---

[१] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये हा शब्द "प्रांतीय" या शब्दाऐवजी दाखल करण्यात आला.

[२] सन १९४९ चा मुंबई अधिनियम ४१, कलम ७ अन्वये कलमे ६-अ, ६-ब व ६-क समाविष्ट करण्यात आली.

[३] सन १९५९ चा मुंबई अधिनियम २ च्या कलम ७(अ) (एक) अन्वये 'नियमन करणे' या शब्दानंतर हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ७(अ) (दोन) अन्वये 'उपक्रमाने' या मजकुरानंतर हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ७(ब) अन्वये समास टिपेतील 'उपक्रमात' हा शब्द वगळण्यात आला.

कलम ६-अ अन्वये दिलेल्या आदेशाचा भंग केल्याबद्दल लायसन रद्द करणे किंवा पुरवठा बंद करणे.

[१][**६ब.** भारतीय वीज अधिनियम, १९१० यात किंवा तदन्वये दिलेल्या कोणत्याही लायसनच्या किंवा मंजुरीच्या अटीत किंवा विजेचा पुरवठा करण्याबाबत केलेल्या कोणत्याही करारात काहीही असेल तरी,— १९१० चा ९.

(अ) कलम ६-अ अन्वये दिलेल्या आदेशाचे लायसनधारक उल्लंघन करील तर, [२][राज्य] शासनाने विजेचा पुरवठा करण्यासाठी अशा लायसनधारकास दिलेले लायसन किंवा मंजुरी रद्द करणे कायदेशीर असेल ; अथवा

[३][(ब) जर कोणताही उपक्रम किंवा ग्राहक, कलम ६-अ अन्वये दिलेल्या आदेशाचे उल्लंघन करील, तर—

(एक) अशा उपक्रमास किंवा ग्राहकास करण्यात येत असलेल्या वीज शक्तीचा पुरवठा बेमुदत किंवा आदेशात नमूद केलेल्या मुदतीसाठी बंद करण्याविषयी किंवा कमी करण्याविषयी लायसनधारकास आदेशाद्वारे राज्य सरकारला निदेश देता येईल आणि लायसनदाराने त्यानंतर अशा उपक्रमास किंवा ग्राहकास करण्यात येत असलेल्या वीज शक्तीचा पुरवठा बंद केला पाहिजे किंवा तो कमी केला पाहिजे ; किंवा

(दोन) निकडीच्या किंवा अशा इतर परिस्थितीशी तोंड देण्यासाठी जेव्हा राज्य सरकार, ते विनिर्दिष्ट करील अशा शर्तींना अधीन ठेवून, कलम ६-अ अन्वये दिलेल्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या उपक्रमास किंवा ग्राहकास करण्यात येणाऱ्या वीज शक्तीचा पुरवठा बंद करण्याविषयी लायसनधारकास प्राधिकार देईल (आणि अशा रीतीने प्राधिकार देण्याचा राज्य शासनाला यावरून अधिकार देण्यात येत आहे), तेव्हा लायसनधारकास स्वत: पुरवठा बंद करता येईल. परंतु लायसनधारकाने वर सांगितल्याप्रमाणे पुरवठा बंद केल्यावर, पुरवठा बंद केल्याच्या वेळेपासून २४ तासांच्या आत, ज्या परिस्थितीत त्याने तसे केले ती परिस्थिती राज्य सरकारला कळविली पाहिजे आणि राज्य सरकारने तसे करण्याबद्दल निदेश दिल्यावर, शक्य त्या त्वरेने पुरवठा पुन्हा चालू केला पाहिजे.]]

विद्युत निरीक्षक किंवा त्याचे सहाय्यक यांच्या कामाबद्दल फी देण्यात कसूर केल्याबद्दल ग्राहकास वीज पुरवठा बंद करणे.

[१][**६क.** (१) विद्युत निरीक्षकाने किंवा भारतीय वीज अधिनियम, १९१० याच्या उपबंधान्वये किंवा तदनुसार केलेल्या कोणत्याही नियमान्वये विद्युत निरीक्षकास सहाय्य करण्यासाठी नेमलेल्या कोणत्याही इतर अधिकाऱ्याने केलेल्या निरीक्षण, तपासणी किंवा परीक्षा किंवा केलेले इतर कोणतेही काम याबद्दल आकारावयाची कोणतीही फी, असे निरीक्षण, तपासणी, परीक्षा किंवा काम याबद्दल झालेले बिल सादर केल्याच्या तारखेपासून दहा दिवसांच्या आत देण्यात कोणताही ग्राहक कसूर करील तर, भारतीय वीज अधिनियम, १९१० यात किंवा तदन्वये दिलेल्या कोणत्याही लायसनच्या किंवा मंजुरीच्या अटीत किंवा विजेचा पुरवठा करण्याबाबत केलेल्या कोणत्याही करारात काहीही असले तरी, [२][राज्य] शासनास किंवा [२][राज्य] शासनाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास लेखी आदेशाद्वारे अशा ग्राहकास करण्यात येत असलेला विजेचा पुरवठा बंद करण्याविषयी लायसनधारकास निदेश देता येईल आणि अशा रीतीने निदेश देण्यात आल्यानंतर लायसनधारकाने अशा ग्राहकास करण्यात येत असलेला विजेचा पुरवठा बंद केला पाहिजे. यामुळे अशी फी वसूल करण्याच्या इतर कोणत्याही अधिकारास बाध येणार नाही. (१९१० चा ९.) (१९१० चा ९.)

(२) ग्राहकाने अशी फी दिल्यावर [२][राज्य] शासनाला किंवा प्राधिकृत अधिकाऱ्याला लेखी आदेशाद्वारे विजेचा पुरवठा पुन्हा जोडून सुरू करण्याबाबत लायसनधारकास निदेश देता येईल आणि अशा रीतीने निदेश देण्यात आल्यानंतर, लायसनधारकाने शक्य तितक्या लवकर अशा ग्राहकास विजेचा पुरवठा पुन्हा जोडून सुरू केला पाहिजे :

---

[१] सन १९४९ चा मुंबई अधिनियम ४१, कलम ७ अन्वये कलमे ६-अ, ६-ब व ६-क समाविष्ट करण्यात आली.

[२] विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये हा शब्द "प्रांतीय" या शब्दाऐवजी दाखल करण्यात आला.

[३] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ८ अन्वये हा उपखंड बदली दाखल करण्यात आला.

परंतु विजेचा पुरवठा पुन्हा जोडण्याबाबतचा आकार ग्राहक लायसनधारकास देईपर्यंत लायसनधारक असा पुरवठा पुन्हा जोडून देण्यास बांधलेला असणार नाही.]

७. या अधिनियमाची कलमे ३, ४, ५, व ६ यांत विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही बाबींच्या संबंधातील केंद्रीय किंवा राज्य सरकारने भारत संरक्षण नियमांपैकी नियम ८१, पोट-कलम (२) या अन्वये दिलेला व हा अधिनियम सुरू होण्याच्या निकटपूर्वी अंमलात असलेला प्रत्येक आदेश, तो उक्त कलमान्वये शासन जेथवर कायदेशीररित्या देऊ शकेल, तेथवर, अंमलात असण्याचे चालू राहील व तो उक्त कलमान्वये देण्यात आलेला आहे, असे समजण्यात येईल आणि अशा आदेशान्वये किंवा तद्नुसार कोणतीही गोष्ट करण्याविषयी जिला प्राधिकृत करण्यात आले असेल, परवानगी देण्यात आली असेल, निदेशित करण्यात आले असेल किंवा भाग पाडण्यात आले असेल अशा प्रत्येक व्यक्तीस, या अधिनियमाच्या उक्त कलमांपैकी कोणत्याही कलमान्वये [१][राज्य] शासनास कायदेशीररित्या यथास्थिति, जेथवर अशा रीतीने प्राधिकृत करता आले असते, परवानगी देता आली असती, निदेशित करता आले असते किंवा भाग पाडता आले असते तेथवर, या अधिनियमांच्या उपबंधान्वये यथास्थिति, अशा रीतीने प्राधिकृत करण्यात आले आहे, परवानगी देण्यात आली आहे. निदेशित करण्यात किंवा भाग पाडण्यात आले आहे असे समजण्यात येईल. अस्तित्वात असलेले आदेश अंमलात असण्याचे चालू.

८. (अ) जी कोणतीही व्यक्ती— शास्ती

(१) कलमे ३, ४, ५, [२][६, ६अ, ६ब किंवा ६क] या अन्वये दिलेल्या किंवा देण्यात आला आहे असे समजण्यात येणाऱ्या कोणत्याही आदेशाचे, अथवा

(२) या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींचे

उल्लंघन करील ; अथवा

(ब) जिला कलमे ३, ४, ५ किंवा ६ अन्वये कोणतीही गोष्ट करण्याविषयी किंवा न करण्याविषयी भाग पाडण्यात आले आहे किंवा निदेश देण्यात आला आहे असे समजण्यात आलेली जी कोणतीही व्यक्ती त्याबाबत दिलेला निदेश किंवा सूचना पाळण्यात कसूर करील, तीस, अपराधसिद्धीनंतर, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कैदेची [३][शिक्षा होईल] किंवा दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

[४][**८अ.** (१) सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे [१][राज्य] शासनाने याबाबत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास, ह्या अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाचे पालन करण्यात आले किंवा नाही हे पाहण्यासाठी कोणत्याही जागेत प्रवेश करता येईल व ती तपासता येईल. प्रवेश, वगैरे करण्याचा अधिकार.

(२) जो कोणी, पोट-कलम (१) अन्वये प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीस, त्या पोट-कलमान्वये त्यास दिलेल्या अधिकाराचा वापर करीत असता, आपखुशीने अडथळा करील त्यास, सिद्धापराध ठरविण्यात आले असता तीन महिन्यांपर्यंत असू शकेल एवढ्या कैदेची शिक्षा होईल किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.]

---

[१] विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये हा शब्द "प्रांतीय" या शब्दाऐवजी दाखल करण्यात आला.

[२] सन १९४९ चा मुंबई अधिनियम ४१, याच्या कलम ८(१) अन्वये हा मजकूर 'किंवा ६' या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ८(२) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ९ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

स्थानिक प्राधिकाऱ्यांनी व महामंडळांनी केलेले अपराध.

[1][९. कलम ८ मध्ये उल्लेख केलेली व्यक्ती स्थानिक प्राधिकारी असेल तर, वीज शक्तीचा पुरवठा करणारा उपक्रम ज्याच्या अधिकाराखाली आहे असा त्याचा मुख्य कार्यकारी अधिकारी आणि अशी व्यक्ती एखादी कंपनी किंवा इतर निगम निकाय असेल तर, तिचा व्यवस्थापन संचालक, व्यवस्थापक, चिटणीस किंवा तिच्या कामाची व्यवस्था पाहणारा इतर प्रमुख अधिकारी हा, असे उल्लंघन आपल्या नकळत घडले किंवा ते घडू नये म्हणून आपण वाजवी ती सर्व दक्षता घेतली होती असे सिद्ध न करील तर, अशा उल्लंघनाबद्दल दोषी आहे असे समजण्यात येईल.]

अपराधांची दखल घेणे.

१०. ह्या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाची दखल, असा अपराध ज्या गोष्टी मिळून होतो त्या गोष्टींबाबत लेखी प्रतिवृत्त [2][राज्य] शासन याबाबत प्राधिकृत करील अशा लोकसेवकांकडून आल्यावाचून, कोणत्याही न्यायालयाने घेता कामा नये.

अधिनियमान्वये करण्यात आलेल्या कृत्यांबद्दल संरक्षण.

११. (१) कलमे ३, ४, ५, [3][६, ६-अ, ६-ब किंवा ६-क] अन्वये दिलेल्या किंवा दिल्याचे समजण्यात येणारा कोणताही आदेश, निदेश किंवा आवश्यकता हीस अनुसरून सद्‌भावनापूर्वक केलेल्या किंवा जे करण्याचा इरादा आहे अशा कोणत्याही कृत्याबद्दल कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कारवाई चालणार नाही.

(२) कलमे ३, ४, ५, [3][६, ६-अ, ६-ब किंवा ६-क] अन्वये दिलेल्या किंवा दिल्याचे समजण्यात येणारा कोणताही आदेश, [4][निदेश किंवा आवश्यकता] हीस अनुसरून सद्‌भावनापूर्वक केलेल्या किंवा जे करण्याचा इरादा आहे अशा कोणत्याही कृत्यामुळे झालेल्या किंवा होण्याचा संभव असलेल्या कोणत्याही नुकसानीबद्दल [5][शासनाविरुद्ध] कोणताही दावा किंवा इतर कायदेशीर कारवाई चालणार नाही.

आदेश किंवा निदेश यांची बजावणी.

१२. या अधिनियमान्वये दिलेला किंवा काढलेला प्रत्येक आदेश किंवा निदेश, शक्य तेथवर भारतीय वीज अधिनियम, १९१०, कलम ५३ यात विहित केलेल्या रीतीने बजावला पाहिजे. १९१० चा ९.

निरसने व व्यावृत्ती.

[6][१३. (१) मुंबई राज्याच्या ज्या भागास हा अधिनियम मुंबई वीज (विशेष अधिकार) (व्याप्ती वाढवणे व सुधारणा) अधिनियम, १९५८ याद्वारे लागू करण्यात आला त्या भागात ह्या अधिनियमाच्या प्रारंभानंतर सौराष्ट्र विद्युत (विशेष अधिकार) अधिनियम, १९५३ निरसित झालेला असेल. १९५९ चा मुंबई २. १९५३ चा सौ. ३.

(२) अधिनियम अशा रीतीने निरसित झाला असला तरी, अशा रीतीने निरसित केलेल्या अधिनियाच्या कोणत्याही तरतुदींन्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा उपाययोजना (यात दिलेल्या किंवा दिले असल्याचे समजण्यात येणाऱ्या आदेशांचा व अनिर्णित कार्यवाहींचा समावेश होतो) ही, ह्या अधिनियामाच्या तरतुदींन्वये केलेली, दिलेली किंवा अनिर्णित आहे असे समजण्यात येईल आणि त्याप्रमाणे असे कामकाज ह्या अधिनियमाच्या तरतुदींन्वये चालू ठेवले जाईल व निकालात काढले जाईल.]

---

[1] सन १९४९ चा मुंबई अधिनियम ४१ याच्या कलम १० अन्वये हे कलम मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[2] विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये हा शब्द "प्रांतीय" या शब्दाऐवजी दाखल करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ११ अन्वये हा मजकूर ' किंवा ६ ' या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम ११ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[5] विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "बादशहा" या मजकुराऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[6] सन १९५९ चा मुंबई अधिनियम २, याच्या कलम ९ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई